

संस्थापक-अध्यक्ष
स्व. साहेबराव वि. बुट्टेपाटील
मा. आमदार,खेड

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्न आयडी.नं.पुवि./पीएन./अेएससी./०३६/१९७७
कनिष्ठ महाविद्यालय कोड नं.जे. ११.०८.००१ एम.सी.व्हि.सी.कोड नं.-पी-५७

।। प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ।।



Website : www.hrmrajgurunagar.com
Email : hrmrajguru@yahoo.com

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरु महाविद्यालय

(कला, विज्ञान व वाणिज्य)

राजगुरुनगर, ता.खेड, जि.पुणे ४१०५०५

नॅक पुर्नरमानांकीत "ब++"

कार्यालय : (०२१३५)२२२०९९

प्राचार्य- डॉ. शिरीष एस्. पिंगळे
एम.एससी,पी.एच.डी.

दि. १८/०३/२०२४

## महत्वाची सूचना

२०१३ पॅटर्न च्या सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की ज्यांचे द्वितीय आणि तृतीय वर्गाचे काही विषय बाकी ( Backlog ) असतील व ज्यांच्या पी.आर.एन ची मुदत संपलेली असेल त्यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या कडून नोव्हेंबर / डिसेंबर - २०२३ व एप्रिल / मे - २०२४ दोन परीक्षा करिता अर्ज भरण्यासाठी शेवटची संधी देण्यात आलेली आहे. ज्यांना सदर परीक्षेस बसायचे असेल त्या सर्वांनी परीक्षा अर्ज भरावा व आपला पदवी अभ्यासक्रम पूर्ण करावा.

अधिक माहितीसाठी महाविद्यालयाच्या परीक्षा विभागास संपर्क साधावा

प्राचार्य.डॉ.एस.एस.पिंगळे

Principal
Hutatma Rajguru Mahavidyalaya
(Arts, Science & Commerce)
Rajgurunagar.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

छाननी व तालिनीकरण कक्ष
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.:२०२५६२१३८४
Website:www.unipune.ac.in

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

*(Formerly University of Pune)*

Scrutiny & Tabulation Section
Ganeshkhind,Pune-411007
Phone: 2025621384
E-mail: dyrst@pun.unipune.ac.in

संदर्भ : परीक्षा/एसॲण्डटी/४०७ दिनांक : १६.०३.२०२४

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

विषय : — सत्रपूर्तता संपलेल्या विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षासाठी (हिवाळी सत्र २०२३ व उन्हाळी सत्र २०२४) परीक्षेस बसण्यासाठी संधी देणेबाबत...

संदर्भ : — १. परिपत्रक क्र.२६५/२०२३,जावक क्र.सीबी/१२२९, दि. ०१/११/२०२३
२. परीक्षा/३५४७, दि.०६/११/२०२३ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भिय क्र. १ च्या परिपत्रकान्वये सत्रपूर्तता संपलेल्या पात्र विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षासाठी (दोन संधी) परीक्षेस बसण्यासाठी संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. (सोबत प्रत) त्यानुसार संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये पात्र विद्यार्थ्यांना विशेष बाब म्हणून संधी मिळण्यासाठी संबंधित महाविद्यालयाकडे अर्ज करण्याबाबत सूचित करण्यात आलेले होते. या पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज मा.प्राचार्य यांनी प्रचलित अनुषंगिक अध्यादेश, विविध केंद्रिय व राज्यस्तरीय प्राधिकरणाचे निकष, परीक्षाविषयक व अभ्यासक्रमविषयक मार्गदर्शक तत्वे व अटी या सर्वांबाबतची खातरजमा करुन आपल्या स्पष्ट अभिप्रायासह अर्ज परीक्षा विभागाकडे सादर करण्याबाबत कळविण्यात आलेले होते. सदर पत्रात नमूद केलेल्या धोरणानुसार पात्र विद्यार्थ्यांना दोन परीक्षांची विशेष संधी फक्त ऑक्टोबर, २०२३ आणि एप्रिल, २०२४ या सत्रांकरिता उपलब्ध करुन दिलेली आहे. (सोबत प्रत)

याबाबत प्राप्त आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, संदर्भिय पत्र क्र.२ मध्ये नमूद केलेला आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून दयावा तसेच अशा विद्यार्थ्यांना भविष्यकाळात पुन:श्च संधी दिली जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी व कोणताही विद्यार्थी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या दोन (ऑक्टोबर, २०२३ आणि एप्रिल, २०२४) परीक्षा संधीपासून वंचित राहणार नाही, याची कृपया दक्षता घेऊन उचित कार्यवाही करावी, ही विनंती.

कळावे,

आपला,

उपकुलसचिव
छाननी व तालिनीकरण कक्ष

CEO Landepatil Kashiwi 18/03/2024

सोबत : वरीलप्रमाणे

D/2020 BBA /Letter

I.No- 414
Date- 18/03/2024

Scanned with OKEN Scanner

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे - ४११००७

# Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०- २५६२११५६/५७/७९
Telephone : 020-25621156/57/79
ईमेल / Email : boards@pun.unipune.ac.in

शैक्षणिक विभाग (मान्यता कक्ष)
Academic Section (Approval Cell)
वेबसाइट / Website: www.unipune.ac.in


परिपत्रक क्र. २६५ / २०२३

विषय :— सत्रपूर्तता संपलेल्या विद्यार्थ्यांना एक शैक्षणिक वर्षासाठी (दोन संधी) परीक्षेस बसण्यासाठी परवानगी देणेबाबत....

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राची शैक्षणिक पूर्तता केलेल्या, मात्र केवळ सत्रपूर्तता संपल्यामुळे (N+2) परीक्षा देऊ न शकलेल्या विद्यार्थ्यांना दोन अतिरिक्त परीक्षांना बसण्याची शेवटची विशेष संधी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

पुढे असेही कळविण्यात येते की, परीक्षा मंडळाने सादर केलेल्या आणि मा. कुलगुरू यांनी मान्यता दिलेल्या आराखड्यानुसार पात्र असणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना अपवादात्मक स्थिती विचारात घेता, यापुढे दोन परीक्षांना बसण्याची शेवटची विशेष संधी देण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मा. प्राचार्य / संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये / परिसंस्था यांना विनंती की, सदर परिपत्रकाचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

गणेशखिंड, पुणे — ४११००७
जा. क्र. :— सीबी / १२२९
दिनांक :— ०१ / ११ / २०२३

(डॉ. मुंजाजी रासवे)
उपकुलसचिव

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी:—

१. मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, प्रस्तुत विद्यापीठ
२. मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, प्रस्तुत विद्यापीठ
३. मा. प्राचार्य / संचालक, सर्व संलग्न महाविद्यालये व परिसंस्था
४. मा. उपकुलसचिव, शैक्षणिक प्रवेश विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
५. सहायक कुलसचिव, शैक्षणिक पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

मा. विद्यापरिषद ठराव क्र. — अ १६ पीए/१६/२०२३ दि. २५ ऑक्टोबर, २०२३

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

Savitribai Phule Pune University

(Formerly University of Pune)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ
गणेशखिंड, पुणे ४११ ००७.
दूरध्वनी क्र.२०२५६२१३४६
Website : www.unipune.ac.in

Board of Examinations & Evaluation
Ganeshkhind, Pune - 411007
Phone: 2025621398
E-mail: dyrst@pun.unipune.ac.in


संदर्भ : परीक्षा/ ३५४७ दिनांक : 6 नोव्हेंबर, २०२३

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये व मान्यताप्राप्त संस्था,
(पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा)

**विषय :** सत्रपूर्तता संपलेल्या विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षासाठी (हिवाळी सत्र २०२३ व उन्हाळी सत्र २०२४) परीक्षेस बसण्यासाठी संधी देणेबाबत...

महोदय / महोदया,

वरील विषयाबाबत विद्यापीठाचे परिपत्रक क्र. २६५/२०२३, दिनांक ०१/११/२०२३ निर्गमित करण्यात आले आहे. या निर्णयानुसार खाली नमूद केलेल्या विद्यार्थ्यांना एका शैक्षणिक वर्षासाठी परीक्षेस बसण्यास संधी देण्यात आली आहे.

१. अंतिम वर्ष अनुत्तीर्ण असलेले, परीक्षाविषयक व अभ्यासक्रमविषयक नियमांनुसार पात्र असलेले विद्यार्थी.

२. अंतिमपूर्व वर्षातील अनुत्तीर्ण असलेले परीक्षाविषयक व अभ्यासक्रमविषयक नियमांनुसार पात्र असलेले विद्यार्थी ज्या विद्यार्थ्यांचा अंतिम वर्षात अनुशेष (बॅकलॉग) आहे, तसेच ज्या विद्यार्थ्यांचा अंतिम पूर्व वर्षात अनुशेष (बॅकलॉग) आहे की ज्यांची सोडवणूक निश्चित केलेल्या विहित कालावधीमध्ये पूर्ण होईल असे सर्व विद्यार्थी.

३. मौखिक, प्रात्यक्षिक, प्रोजेक्ट, डेझरटेशन इ. व अशा इतर अनुषंगिक परीक्षांमध्ये अनुत्तीर्ण असणारे परीक्षाविषयक व अभ्यासक्रमविषयक नियमांनुसार पात्र असलेले विद्यार्थी.

४. वर नमूद केलेल्या क्र. १ व २ मध्ये अंतर्भूत न होणारे विद्यार्थी उरल्यास अशा विद्यार्थ्यांनी विशेष बाब म्हणून संधी मिळण्यासाठी संबंधित महाविद्यालयाकडे अर्ज करावेत. असे एक वर्ष संधीसाठी पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांचे अर्ज मा. प्राचार्य यांनी प्रचलित अनुषंगिक अध्यादेश, विविध केंद्रिय व राज्यस्तरीय प्राधिकरणाचे निकष, परीक्षाविषयक व अभ्यासक्रमविषयक मार्गदर्शक तत्वे व अटी या सर्वांबाबतची खातरजमा करून सदर पात्र विद्यार्थ्यांच्या विनंतीबाबत स्पष्ट अभिप्रायासह असे अर्ज परीक्षा विभागाकडे सादर करावेत.

सदर विशेष सवलत दिलेल्या विद्यार्थ्यांना नियमित परीक्षांमध्ये सामावून घेणे शक्य असल्यास ते समकक्ष विषयांनुसार परीक्षा देतील, अन्यथा अशा विद्यार्थ्यांची परीक्षा स्वतंत्रपणे आयोजित करण्यात येईल. वरील क्र. १ ते ४ मध्ये नमूद केलेल्या धोरणानुसार

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

पात्र विद्यार्थ्यांना दोन परीक्षांची विशेष संधी मिळाल्यानंतरच्या काळात यापैकी कोणत्याही विद्यार्थ्यांस व अशा इतर विद्यार्थ्यांना भविष्यकाळात संधी दिली जाणार नाही.

सदर पत्राचा आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा व कोणताही पात्र विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही, याची योग्य ती दक्षता घेवून कार्यवाही करावी, ही विनंती.

कळावे,

आपला,

(डॉ. महेश काकडे)
संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner